# परसातील कुक्कुटपालनासाठी उपयुक्त जाती

प्रा. सागर सकटे, विषय विशेषज्ञ
(पशुविज्ञान व दुग्धशास्त्र)
कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव

कुक्कुटपालन हा एक उत्तम शेतीपुरक व्यवसाय आहे. कमीत कमी गुंतवणूकीमध्ये शेतकरी परसातील कुक्कुटपालन करु शकतात. याच्यापासुन नियमित व हमखास उत्पन्न शेतकऱ्यांना मिळू शकते. ज्यामुळे दैनंदिन घरगुती गरजा भागवणे व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचाविण्यास मदत होईल. परसातील कुक्कुटपालनामध्ये दुहेरी उत्पन्न देणाऱ्या काही सुधारित जाती खालीलप्रमाणे आहेत. ज्या मांस व अंडी अशी दोन्हीही उत्पादने देतात. शिवाय त्यांचे मरतुकीचे प्रमाण सुध्दा कमी आहे.

## १. वनराजा

कुक्कुटपालन प्रकल्प संचालनालय, हैद्राबाद यांनी विकसित केलेली ही जातआहे. या जातीच्या पक्षांमध्ये आकर्षक विविध रंगाची पिसे आढळतात. रोग प्रतिकारक शक्ती उत्तम आहे. तसेच वजन वाढीचा दर चांगला आहे. व देशी पक्षांपेक्षा अधिक अंडी उत्पादन परसबागेतील कुक्कुटपालनामध्ये मिळते.


मांस उत्पादन:-

सहा आठवडे वयामध्ये - ६५० ते ७५० ग्रॅम
पुर्ण वाढ झाल्यानंतर - २००० ते २२०० ग्रॅम

अंड्याचे वजन:-

बावीस आठवडे वयानंतर - ४२ ते ४४ ग्रॅम
चाळीस आठवडे वयानंतर - ५२ ते ५८ ग्रॅम

अंडी उत्पादन :- १०० ते ११० अंडी प्रति वर्ष
अंडी घालण्याचे वय :- १७५ ते १८० दिवस



## २. श्रीनिधी

परसातील कुक्कुटपालनासाठी योग्य असणारी ही जात उत्तम अंडी उत्पादन देऊ शकते. श्रीनिधी हया जातीचा भारताच्या विविध राज्यांमध्ये सांभाळ केला जाऊ शकतो. या पक्षांमध्ये अंडी उत्पादन लवकर सुरु होते. व अंड्यांचा आकारही तुलनेने मोठा आहे.

अंडी घालण्याचे वय :- १७० ते १७५ दिवस

मांस उत्पादन:-

सहा आठवडे वयामध्ये - ५०० ते ५५० ग्रॅम
पुर्ण वाढ झाल्यानंतर - २२०० ग्रॅम

अंडी उत्पादन :- १४० ते १५० अंडी प्रति वर्ष
चाळीस आठवडे वयानंतर - ५५ ते ६० अंडी



### ३. ग्रामप्रिया:-

ग्रामिण भागात परसबागेतील कुक्कुटपालनामध्ये अधिक अंडी उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने कुक्कुटपालन प्रकल्प संचालनालय, हैद्राबाद येथे ही जात विकसित करण्यात आली आहे. या जातीच्या नरांचे मांस हे तंदुरी पध्दतीचे पदार्थ बनविण्यासाठी उत्तम आहे. मध्यम शारिरीक वजनामुळे हे पक्षी मुक्त संगोपनामध्ये भक्ष्यकापासून स्वतःचा जिव वाचवू शकतात. ग्रामप्रिया या जातीच्या पक्ष्यांमध्ये उत्तम रोगप्रतिकारक शक्ती आहे.



मांस उत्पादन:-

सहा आठवडे वयामध्ये - ४०० ते ५०० ग्रॅम

पुर्ण वाढ झाल्यानंतर - १६०० ते १८०० ग्रॅम

अंडयाचे वजन:-

अठ्ठावीस आठवडे वयानंतर - ४९ ते ५२ ग्रॅम

चाळीस आठवडे वयानंतर - ५७ ते ५८ ग्रॅम

अंडी घालण्याचे वय :- १६० ते १६५ दिवस

अंडी उत्पादन :- १६० ते १८० अंडी प्रति वर्ष

### ४. ऱ्होड आयर्लंड रेड

हा दुहेरी उत्पादन देऊ शकणारा पक्षी आहे. या पक्ष्याचा रंग तपकिरी असतो हे पक्षी आकाराने मोठे असतात व मांस उत्पादन जास्त देतात. ऱ्होड आयर्लंड रेड या जातीच्या पक्ष्यांची रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असल्याने ते परसबागेतील कुक्कुटपालनासाठी योग्य आहेत.



मांस उत्पादन:-

पुर्ण वाढ झाल्यानंतर - २००० ते २५०० ग्रॅम

अंडयाचे वजन:-

चाळीस आठवडे वयानंतर - ५० ते ६० ग्रॅम

अंडी घालण्याचे वय :- १७० ते १७५ दिवस

अंडी उत्पादन :- १८० ते २०० अंडी प्रति वर्ष

### ५. गिरीराज

विविध रंगाचे पंख असणारा ह्या जातीचा पक्षी चविष्ट व उत्तम मांस उत्पादनासाठी ओळखला जातो. या पक्ष्याच्या मांसाची चव गावरान कोंबडीच्या मांसाप्रमाणे असते. गिरिराज पक्ष्यांना सरासरी ६५ किलो खाद्य लागते.

एक दिवशीय पिल्लांचे वजन- ४५ ते४६ ग्रॅम

मांस उत्पादन- आठ अटवड्यांमध्ये- १६०० ग्रॅम

अंडी उत्पादन- १५० अंडी प्रति वर्ष



## ६. ब्लॅक ॲस्ट्रोलॉर्प

काळ्या रंगाचा हा पक्षी प्रतिकूल परिस्थितीत तग धरण्याच्या क्षमतेमुळे परसबागेतील संगोपणास योग्य आहे. या पक्ष्यापासून मिळणा-या अंड्याचा रंग तांबडा असून अंड्याचा आकार देशी पक्ष्याच्या अंड्यापेक्षा मोठा आहे.

एक दिवशीय पिल्लांचे वजन- ४० ग्रॅम

मांस उत्पादन- आठ अटवड्यांमध्ये- १००० ग्रॅम

बारा अटवड्यांमध्ये- १५०० ते २००० ग्रॅम

अंडी उत्पादन- १७० ते १८० अंडी प्रति वर्ष

अंडयाचे वजन:- ५८ ग्रॅम



## ७. कडकनाथ

मध्यप्रदेश मधील मुळस्थान असलेला हा पक्षी पूर्ण काळ्यारंगाचा आहे. कडकनाथ कोंबडीपासून मिळणारे मांस उत्पादन तुलनेने कमी आहे पण यामध्ये अधिक पौष्टिक गुणधर्म असल्यामुळे या मांसाला अधिक मागणी आहे.

एक दिवशीय पिल्लांचे वजन- २८ ते ३० ग्रॅम

मांस उत्पादन- आठ अटवड्यांमध्ये- ८०० ग्रॅम

अंडी उत्पादन- १२० अंडी प्रति वर्ष

